(राज्य निवडणूक आयोगाच्या क.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का., दि. ०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट-९ (ब)**

**पंचायत समिती प्रारूप आरक्षणाबाबतची अधिसूचना**

क्रमांक **२०२५/सा.प्र./जिपपंसनि/प्र.क्र.१६** ज्याअर्थी; राज्य शासनाकडील क्रमांक **जिपनि-२०२५/प्र.क्र.३६/पं.रा.-२ दि. १२.०६.२०२५ व १८.०६.२०२५** रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार पाथरी पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरिता १० निर्वाचक गणांच्या भौगोलिक सिमा **क्र.२०२५/सा.प्र./जिपपंसनि/प्र.क्र.०२ दि.२२.०८.२०२५** च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत,

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील **क्र.रानिआ/जिपपंसनि/२०२५/प्र.क्र.२९/का-०७, दिनांक ०१.१०.२०२५** च्या आदेशान्वये पाथरी पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडील क्र. **क्र.रानिआ/जिपपंस/२०२५/प्र.क्र.२९/का-०७, दिनांक ०१.१०.२०२५** च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची सोडतीद्वारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारूप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार पाथरी पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दि.१३.१०.२०२५ रोजी काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना यादवारे प्रसिध्द करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, सदर प्रारुप आरक्षणाची अधिसूचना जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी, परभणी व तहसीलदार पाथरी यांच्याकडे दिनांक १७.१०.२०२५ पर्यंत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

## पाथरी पंचायत समितीमधील एकुण जागांचा तपशिल

| अ.क्र. | प्रवर्ग | एकुण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ०२ | ०१ |
| २ | अनुसूचित जमाती | ०० | ०० |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ०२ | ०१ |
| ४ | सर्वसाधारण | ०६ | ०३ |
| | **एकुण** | **१०** | **०५** |

## पाथरी पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशिल

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | पाथरी | ३०-हादगाव बु. | ५९-हदगाव बु. | सर्वसाधारण महिला |
| २ | पाथरी | | ६०-रेणाखळी | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ३ | पाथरी | ३१-देवनांद्रा | ६१-देवनांद्रा | सर्वसाधारण महिला |
| ४ | पाथरी | | ६२-देवेगाव | अनुसूचित जाती महिला |
| ५ | पाथरी | ३२- कासापुरी | ६३-कासापुरी | सर्वसाधारण महिला |
| ६ | पाथरी | | ६४-रामपुरी खु. | सर्वसाधारण |
| ७ | पाथरी | ३३- बाभळगाव | ६५-बाभळगाव | सर्वसाधारण |
| ८ | पाथरी | | ६६-कानसुर | सर्वसाधारण |
| ९ | पाथरी | ३४- लिंबा | ६७-लिंबा | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| १० | पाथरी | | ६८-वाघाळा | अनुसूचित जाती |

ठिकाण: पाथरी

दिनांक: १३.१०.२०२५

**(एस.एन.हांदेश्वार)**
**तहसिलदार पाथरी**

**(संगीता चव्हाण)**
**प्राधिकृत अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी पाथरी**

**(संजयसिंह चव्हाण) भा.प्र.से**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा**
**निवडणूक अधिकारी परभणी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी परभणी

Scanned with OKEN Scanner